महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ७

# महाराजा सयाजीराव आणि खासेराव जाधव

शिवानी घोंगडे



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ७

# महाराजा सयाजीराव
# आणि
# खासेराव जाधव

शिवानी घोंगडे

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि खासेराव जाधव
इतिहास
शिवानी घोंगडे
●
प्रकाशन क्रमांक - २७
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : शिवानी घोंगडे,
सकटे गल्ली, मोहरे,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. ४१६११४
मो. ८०१०४४७७४०
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ३३ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/**
  **101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/**
  **1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# खासेराव जाधव

राज्यकर्ता कितीही दूरदृष्टीचा असला तरी राज्यकारभार यशस्वी करण्यासाठी त्याला विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, इमानदार आणि प्रचंड कष्ट उपासण्याची तयारी असणाऱ्या साथीदारांची गरज असते. ज्ञानी लोक सोबत ठेवणे हे फार कठीण काम असते. कारण राज्यकर्त्यांचा अहंकार टोकदार असतो. तज्ज्ञ आणि इमानदार साथीदार मात्र राज्यकर्त्यांच्या अहंकारापेक्षा राज्याच्या कल्याणाचा विचार करत असतात. परिणामी राज्यकर्त्याला ज्ञान आणि ज्ञानी लोक यांचे वावडे असते. कोणत्याही क्षेत्रात सर्वोत्तम काम करायचे असेल तर नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीला आपल्या व्यक्तिगत आवडी-निवडी बाजूला ठेवून आपल्या मनाविरुध्द दिलेला सल्लासुध्दा स्वीकारावा लागतो. हे सर्व साधण्यासाठी राज्यकर्त्यांकडे ज्ञानाबद्दलचा प्रामाणिक आदर आणि आपल्या सोबतच्या लोकांच्या कर्तबगारीबद्दलसुध्दा आदर असावा लागतो.

सयाजीरावांनी आपल्या ६४ वर्षांच्या प्रदीर्घ कारकीर्दीत विविध क्षेत्रातील शेकडो देश विदेशातील विद्वानांशी संवाद ठेवला. अनेक गुणी लोक आपल्या प्रशासनात महत्त्वाच्या पदावर नेमले. त्यांना जपले, त्यांच्या ज्ञानाचा उपयोग आपले राज्य सर्वोत्तम करण्यासाठी कौशल्याने करून घेतला. आपल्या राज्यातील कर्तबगार अधिकाऱ्यांचे पुतळे कीर्तीमंदिर उभा करून बसवले. खासेराव जाधव हे सयाजीरावांचे जवळचे नातेवाईक जसे होते तसेच सयाजीरावांशी अत्यंत प्रामाणिक असणाऱ्या अधिकाऱ्यांपैकी ते एक होते. सयाजीरावांचे नातू आणि बडोद्याचे उत्तराधिकारी प्रतापसिंह यांच्या शिक्षणाचा आराखडा खासेरावांनी तयार केला होता. प्रतापसिंहांचे पालक झाल्यानंतर राजपुत्रांच्या शिक्षणासाठीची त्यांनी जी टाचणे काढली ती 'वेक अप प्रिंसेस' या नावाने ग्रंथबद्ध झाली. प्रतापसिंहांवर कुटुंब कलहातून विषप्रयोग होऊ शकतो ही शक्यता विचारात घेऊन खासेराव प्रतापसिंहांना जे अन्न-पाणी दिले जाई ते प्रथम स्वत: ग्रहण करू लागले. यातच एके दिवशी विषबाधा होऊन खासेरावांचा मृत्यू झाला. राजासाठी आणि राज्यासाठी स्वत:च्या प्राणाचे बलिदान देण्याची ही निष्ठा ज्या राज्याच्या सेवेतील लोकांची असते तेच राज्य महान राज्य होऊ शकते हेच यातून सिद्ध होते.

## सयाजीरावांचे जिवलग

खासेराव जाधव सयाजीरावांचे नातेवाईक होते. सयाजीरावांच्या मातोश्री महाराणी जमनाबाई यांचे वडील विश्वासराव माने हे खासेरावांचे मामा होते. खासेरावांचा जन्म रहिमतपूर या मामांच्या गावी २४ ऑगस्ट १८६४ ला झाला. आई गुजाबाई व वडील भगवंतराव यांना बाबूराव, खासेराव व माधवराव ही तीन मुले होती. खासेरावांना शिक्षणासाठी पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ठेवले होते. मॅट्रिक परीक्षेनंतर खासेरावांनी एलफिन्स्टन कॉलेजमधून इंटरमीजिएटची परीक्षा उत्तीर्ण केली. खासेरावांचे वडील भगवंतराव जाधव जमनाबाईंचे मानकरी असल्याने खासेराव उन्हाळा आणि दिवाळीच्या सुटीत बडोद्याला येऊ लागले. या काळात त्यांचा मुक्काम राजवाड्यातच असे. यादरम्यान सयाजीराव, संपतराव, आनंदराव या राजपुत्रांशी खासेरावांचा स्नेह वाढत गेला.

खासेराव जाधव आणि सयाजीराव यांच्यातील नाते तर फारच अनोखे आणि मैत्रीचे होते. ते सयाजीरावांचे नातेवाईक असण्याबरोबरच जिवलग मित्र आणि विश्वासू अधिकारीही होते. सयाजीरावांनी त्यांचे लहान बंधू संपतराव गायकवाड आणि खासेराव यांना १८८४ मध्ये उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला पाठविले. तेथे खासेरावांनी ऑक्सफर्डच्या कृषी महाविद्यालयात कृषिविषयक पदवी घेतली. १८९० मध्ये ते शिक्षण पूर्ण करून लंडनहून बडोद्याला आले. लंडनहून परत येताना त्यांनी तंत्रज्ञान,

शेती, दुग्धव्यवसाय, फळबाग, पाणी व्यवस्थापन या विषयांची महत्त्वाची पुस्तके बडोद्यासाठी आणली. त्याबरोबर पारतंत्र्याच्या बेड्या तोडून स्वतंत्र भारताचे स्वप्न घेऊन ते परतले.

## बडोद्याच्या कृषी क्षेत्राचे नेतृत्व

सयाजीरावांनी १८९७ ला खासेरावांच्या नेतृत्वाखाली बडोद्यात कृषी खात्याची स्थापना केली. बडोद्यात शेतकऱ्यांच्या कल्याणाच्या ज्या सर्व योजना राबविल्या गेल्या त्याचे सूत्रधार खासेराव होते. बडोद्यात काही वर्षांच्या अंतराने दुष्काळ पडत असे. या दुष्काळावर कायमस्वरूपी उपाय म्हणून खासेरावांनी ओरसंग पाणीपुरवठा प्रकल्पाचा आराखडा तयार केला. १९०० मध्ये या ओरसंग पाटबंधाऱ्याच्या उद्घाटनप्रसंगी केलेल्या भाषणात सयाजीरावांनी या पाणीपुरवठा योजनेच्या कल्पनेचे श्रेय खासेरावांना दिले आहे. सयाजीराव म्हणतात, "आमचे अधिकारी खासेराव जाधवांनी या कामाचा आराखडा तयार केला. त्यांनी आम्हाला सुचविल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. दुष्काळी म्हणून आरंभिलेले हे काम खूप महत्त्वाचे आहे. कारण तात्कालिक मदत देण्याखेरीज या कामाचे स्वरूप कायमस्वरूपाचे उपाय म्हणून मदत होणार आहे." शेती खात्याचे प्रमुख या नात्याने खासेरावांनी शेतीसाठी विविध योजना यशस्वीपणे राबविल्याचा हा पुरावाच म्हणावा लागेल.

दुष्काळात शेतीला कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्यासाठी बडोदा सरकारने बारा हजारांहून अधिक विहिरी खोदल्या. त्याचबरोबर विहिरीवर ऑइल इंजिन बसविण्यास प्रोत्साहन दिले. याच्याही पुढे जाऊन शेती नांगरण्यासाठी जर्मनीतून ट्रॅक्टर मागविण्यात आला. खासेरावांनी जर्मनीहून हा पहिला ट्रॅक्टर मागविण्यास मदतही केली. त्याचबरोबर पाशाभाई पटेल या गुजराथी उद्योगपतीस ट्रॅक्टरचा कारखाना काढण्यास प्रोत्साहनही दिले. सुधारित बी-बियाणे, फळबागांची लागवड, शेतीला कुक्कुटपालन हा जोडधंदा, दूध संकलन या विविध कल्पना खासेराव जाधवांच्या होत्या. एवढेच नव्हे तर शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आपला शेतीमाल विकावा म्हणून शेतकऱ्यांचे गटही त्यांनी निर्माण केले. शेतीतून निघणारे उत्पन्न विकण्यासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देताना शेतीमालांचे प्रदर्शन भरवण्याची कल्पनाही खासेरावांनीच रुजविली. त्याच्याही पुढे जाऊन खासेरावांनी १९२० च्या सुमारास पिकावर पाण्याच्या फवारा पद्धतीचा वापर करून शेती करण्यास सुचविले. ही फवारा पद्धत म्हणजे आजची स्प्रिंक्लर पद्धत होय. शेतीसाठी खासेरावांनी राबविलेल्या या विविध योजना सयाजीरावांचा खासेरावांना शेतकी शिक्षणासाठी परदेशात पाठविण्याचा निर्णय किती योग्य होता याची साक्ष देतात.

महाराज जरी आरोग्य स्वास्थ्यासाठी परदेश प्रवास करत असले तरी परदेशात जे जे उत्तम आहे ते ते आपल्या संस्थानच्या

विकासासाठी अवलंबण्याचे धोरण त्यांनी ठेवले. परदेशात सयाजीरावांनी शेतकऱ्यांच्या पतपेढ्या बघितल्या होत्या. अनेक शेतकरी एकत्र येऊन अशी संस्था स्थापन करतात. त्या पतपेढ्या गरजू शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात अल्पशा व्याजदरात कर्जाऊ रकमा देतात. शेतीमालांची विक्री करण्यासाठीही या संस्था मदत करतात. अशा पतपेढ्या बडोद्यात सुरू करून सावकारांकडून होणारा शेतकऱ्यांचा आर्थिक छळ थांबवावा असे महाराजांना वाटत होते. या कामाची जबाबदारी सयाजीरावांनी खासेरावांवर सोपविली. त्याप्रमाणे खासेरावांनी बडोद्यात शेतकऱ्यांच्या पतपेढ्या सुरू केल्या. शेतकऱ्यांच्या पतपेढ्यांचा प्रयोग भारतात पहिल्यांदा राबविण्याचे श्रेय सयाजीरावांना जाते.

सयाजीरावांप्रमाणेच खासेरावही परदेशातील उत्तम गोष्टींच्या अनुकरणास प्रोत्साहन देत असत. खासेराव लंडनमध्ये शिकत असताना त्यांना जर्मनीतील शिक्षणसंस्था बघण्याची संधी मिळाली. एकाच संस्थेत असणारी वेगवेगळ्या तांत्रिक शिक्षणाची सोय खासेरावांना विशेष आवडली. अशा प्रकारची संस्था बडोद्यातही असावी असे त्यांना वाटू लागले. या संदर्भातील एक आराखडा तयार करून खासेरावांनी सयाजीरावांकडे पाठविला. खासेरावांची ही योजना महाराजांनाही आवडली. त्यानुसार बडोद्यात १८९० मध्ये दहा विद्यार्थ्यांसह 'कलाभवन' या तांत्रिक शिक्षण संस्थेची सुरुवात झाली. त्यावर प्रो. गज्जर यांची प्राचार्य म्हणून नेमणूक केली. या कलाभवनमध्ये पुढे

इंजिनिअरिंग, चित्रकला, आर्किटेक्ट, विणकाम, रंगकाम या तंत्रशाखांचे शिक्षण दिले जाऊ लागले. कलाभवन ही विविध प्रकारचे तांत्रिक शिक्षण देणारी तत्कालीन भारतातील एक उत्तम पॉलीटेक्निक संस्था होती.

## क्रांतिकारक खासेराव

लंडनमध्ये असताना श्यामजी कृष्ण वर्मा व त्यांचा क्रांतिकारकांचा गट यांच्याशी खासेरावांची मैत्री झाली. केशवराव देशपांडे, गोविंदराव माडगावकर आणि अरविंद घोष यांच्यात त्यावेळी झालेली मैत्री आयुष्यभर टिकली. अरविंद घोष आणि केशवराव देशपांडे यांनाही बडोद्यात आणण्यामध्ये महत्त्वाची भूमिका खासेरावांची होती. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य प्राप्तीसाठी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने प्रयत्न करणाऱ्या सर्व क्रांतिकारकांना सयाजीराव खासेरावांमार्फत सहकार्य करत असत.

खासेराव जाधव, त्यांचे लहान बंधू मेजर माधवराव, प्रो. माणिकराव यांनी अरविंद घोष बडोद्यात येण्यापूर्वी समविचारी मित्रांचा गट असणारी ‘तरुणसंघ’ नावाची संघटना स्थापन केली होती. संघटनेच्या सभासदांत बडोदा सरकारच्या नोकरीतील अनेक अधिकारी नोकर होते. खासेराव जाधवांच्या घरी या संघटनेच्या बैठका होत असत. पुढे अरविंद घोष व केशवराव देशपांडे बडोद्यात आल्यानंतर या संघटनेच्या कामास अधिक वेग आला. अरविंद घोष खासेरावांच्या घरीच राहू लागले. खासेराव

जाधवांचे निवासस्थान हे क्रांतिकारकांचा अड्डा बनला. या ठिकाणी लोकमान्य टिळक, सयाजीराव, अरविंद घोष यांच्या भेटीगाठीतून राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा आराखडा तयार होत गेला. खासेरावांवर लोकमान्य टिळकांच्या विचारांचाही प्रभाव होता. खासेरावांच्या पुढाकाराने बडोद्यात गणेशोत्सव, शिवजयंती हे राष्ट्रप्रेमाच्या निमित्त होणारे कार्यक्रम सुरू झाले.

अरविंद घोष यांच्या कल्पनेतून आणि सयाजीरावांच्या पाठिंब्याने नर्मदाकाठी 'भारतीय गंगनाथ राष्ट्रीय विद्यालया'ची स्थापना करण्यात आली. अरविंद घोष, खासेराव जाधव, केशवराव देशपांडे आणि प्रा. माणिकराव हे या राष्ट्रीय विद्यालयाचे संचालक होते. राष्ट्रप्रेमी आणि राष्ट्रवादी विचारांनी प्रेरित झालेले देशभक्त तयार करण्याच्या उद्देशाने १७ मे १९०५ या दिवशी राष्ट्रीय विद्यालयाची सुरुवात झाली. या ठिकाणी राष्ट्रप्रेम, शारीरिक शिक्षण, सांस्कृतिक वारसा आणि शस्त्रांची उपासना शिकविली जाई. त्याचबरोबर देशभरातील राष्ट्रीय विचारांच्या देशभक्तांना येथे बोलावून त्यांच्या भाषणांचे आयोजनही केले जात असे.

खासेराव जाधव, बॅरिस्टर केशवराव देशपांडे आणि त्यांचे मित्र या विद्यालयाच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले. केशवराव तर आपल्या पगारातील काही रक्कम या विद्यालयात द्यायचे. थोड्याच काळात बडोद्यातील हे विद्यालय राष्ट्रीय घडामोडींचे प्रमुख केंद्र बनले. परंतु ब्रिटिश सरकारला हे विद्यालय राजद्रोह

वाटू लागले. ब्रिटिश सरकारच्या वाढत्या दबावामुळे डिसेंबर १९११ ला हे विद्यालय बंद करण्यात आले.

आपल्या देशाचा उद्धार सर्व जाती-धर्मांची माणसेच करतील. आपला देश स्वतंत्र विचारसंपन्न राष्ट्राच्या पंगतीला येण्यासाठी, सर्वांना एकत्रित प्रयत्न करावे लागतील, असे खासेरावांचे ठाम मत होते. यासाठी तरुणांना सैनिकी शिक्षण देणे आवश्यक आहे. ब्रिटिशांविरुद्ध बंड करण्यासाठी बंडखोर देशभक्तांची आणि सैनिकांची संख्या वाढली पाहिजे असे त्यांना वाटे. यासाठीच खासेराव आणि अरविंद घोषांनी महाराजांच्या सहकार्याने बडोद्यात एक महत्त्वाची क्रांतिकारी घटना घडवून आणली. खासेरावांचे लहान बंधू माधवराव जाधव हे बडोदा सैन्यात मेजर होते. माधवरावांना स्विस सैनिकी प्रशिक्षणासाठी स्वित्झर्लंडला पाठविण्याची योजना बाळ गंगाधर टिळक, अरविंद घोष आणि खासेराव जाधवांनी तयार केली.

नवीन शस्त्रांचा अभ्यास करणे, बॉम्ब बनविण्याचे प्रशिक्षण घेणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य हेतू होता. या प्रशिक्षणासाठी सयाजीरावांनी माधवरावांना रजा मंजूर करून प्रशिक्षणाच्या खर्चाची तरतूदही केली. त्याचबरोबर बाळ गंगाधर टिळकांनी लंडनमधील क्रांतिकारी श्यामजी कृष्ण वर्मा यांना पत्र लिहून माधवरावांना प्रशिक्षण काळात पैसे कमी पडल्यास मदत करण्यास सांगितले. माधवरावांनी प्रशिक्षण पूर्ण करून येताना बरोबर सैनिकी व्यवस्थापनाची सुमारे दोनशे पुस्तके आणली.

प्रशिक्षण घेऊन परत आल्यानंतर माधवरावांनी बडोद्यात विश्वासू अधिकाऱ्यांच्या मदतीने क्रांतिकारकांना प्रशिक्षण देण्याचे केंद्र सुरू करण्याची योजना अरविंद घोष आणि खासेरावांनी आखली.

## प्रशासक खासेराव

१९०९ ला खासेराव जाथव मेहसाणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी होते. खासेरावांच्या प्रेरणेने नरसिंहभाई पटेल यांनी गावातील शिक्षक प्रेसमध्ये 'मुक्ति कोन पथे' या बंगाली क्रांतिकारी पुस्तकाचा गुजराती अनुवाद छापला. यापूर्वी नरसिंहभाईंनी क्रांतिकारी गॅरिबाल्डीचे चरित्रही छापले होते. दुसऱ्या एका पुस्तकाच्या मुखपृष्ठावर 'वनस्पती' असे शीर्षक आणि आत मात्र बॉम्ब कसे तयार करावे याची माहिती दिली होती. राष्ट्रवादाची प्रेरणा देणारी ही सर्व पुस्तके इंग्रज पोलिस अधिकाऱ्यांनी जप्त केली. खासेरावांनी त्या इंग्रज पोलिस अधिकाऱ्यांना, बडोदा सरकारच्या हद्दीत छापा टाकायला तुम्हाला कोणी परवानगी दिली? अशा कडक शब्दात खडसावले आणि योग्य ती कारवाई करण्याचा संदेशही दिला. यासंदर्भात सयाजीरावांनी गव्हर्नरकडे कडक तक्रार केली. याला उत्तर म्हणून गव्हर्नरकडून सयाजीराव महाराजांना दिलगिरीचे पत्र आले.

केशवराव देशपांडे आणि खासेराव जाधव हे महाराजांचे दोन्ही कलेक्टर राजद्रोही चळवळीच्या लोकांना संरक्षण देतात, त्यांच्याविरुद्ध महाराजांनी चौकशी करावी म्हणून गव्हर्नर आणि

व्हाइसरॉय यांच्याकडून दबाव वाढू लागला. व्हाइसरॉय यांनी केशवराव देशपांडे आणि खासेराव जाधव यांना राज्याच्या सेवेतून काढून टाकण्याचा आदेश दिला. आपल्यामुळे महाराजांवर वरिष्ठ सत्ता नाराज आहे. यातून महाराजांवर संकटे वाढू नयेत म्हणून केशवराव देशपांडे यांनी स्वतःच नोकरीचा राजीनामा दिला. केशवरावांनी प्रामाणिकपणे राज्याची सेवा केल्याबद्दल सयाजीरावांनी त्यांना दहा हजार रुपये देऊन सेवामुक्त केले. दुसरे अधिकारी खासेराव यांनाही मुक्त करावे, हा ब्रिटिश सरकारचा आग्रह मात्र महाराजांनी धुडकावून लावला. सयाजीरावांनी खासेरावांची दुसऱ्या खात्यात तात्पुरती बदली केली. दोन वर्षे वार्षिक पगारवाढ रोखण्याचे नाटकी आदेश काढले. थोड्याच दिवसात सयाजीरावांनी हा निर्णय बदलला.

## महाराष्ट्राचे हितचिंतक

खासेरावांचे महाराष्ट्राला पहिले महत्त्वाचे योगदान म्हणजे विठ्ठल रामजी शिंदेंना बडोद्याची शिष्यवृत्ती मिळवून देणे. शिंदेंना पदवी शिक्षणाला सयाजीरावांकडून शिष्यवृत्ती मिळवून देण्यामध्ये लक्ष्मणराव माने यांच्याबरोबर खासेरावांची भूमिकाही महत्त्वाची होती. ज्याप्रमाणे पुढे केळूसकर आणि यंदे यांच्यामुळे बाबासाहेबांना बडोद्याची शिष्यवृत्ती मिळाली. त्याचप्रमाणे १८९६ मध्ये शिंदेना शिष्यवृत्ती मिळवून देऊन अस्पृश्य उद्धाराच्या कामाची पार्श्वभूमी तयार करण्यामध्येही खासेरावांनी एकप्रकारे ऐतिहासिक योगदान दिले होते. यासंदर्भात गो.मा. पवार

म्हणतात, “पुढची बी.ए.ची दोन वर्षे कशी जावी हा घोर तसाच राहिला. अशा परिस्थितीत त्यांना बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव महाराज यांची भेट घ्यावी असा विचार आला. बडोदा येथे श्री. लक्ष्मणराव माने व श्री. खासेराव जाधव या प्रतिष्ठित मराठा गृहस्थांशी त्यांचा परिचय झाला होता. या दोन सद्गृहस्थांच्या शिफारशीमुळेच महाराजांनी विठ्ठलरावांसारख्या विद्यार्थ्याची गाठ घेतली. महाराजांनी त्यांना दरमहा पंचवीस रुपये स्कॉलरशिप दिली ”

खासेरावांनी आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी केलेल्या कामाबाबत महाराष्ट्र अनभिज्ञ आहे. २०१५ मध्ये बाबा भांड यांनी खासेरावांचे पहिले चरित्र लिहिल्यामुळे महाराष्ट्राचा हा ‘हिरा’ प्रकाशात आला. महात्मा फुल्यांनी सुरू केलेल्या बहुजन शिक्षणाच्या कार्याला महाराष्ट्रात कर्मवीर भाऊराव पाटलांच्या अगोदर ४० वर्षे खासेरावांनी बडोद्यातून दिलेली गती बहुजन समाजाच्या इतिहासात नोंदवली गेलेली नाही. महाराष्ट्रातील मराठा जातीतील मुलांच्या शिक्षणासाठी एक संस्था असली पाहिजे या भूमिकेतून १०० वर्षापूर्वी जनरल नानासाहेब शिंदे यांना बरोबर घेऊन निधी संकलनाचे प्रयत्न खासेरावांनी बडोद्यात सुरू केले. या निधीला ‘मराठा फंड’ असे नाव होते. या कामासाठी सयाजीरावांनी मोठी रक्कम दिली. यामध्ये खासेरावांनी स्वत:चे २५ हजार रुपये घातले. समाजातील आर्थिक स्थिती चांगली असलेल्या मंडळींकडून या फंडासाठी मदत मिळवण्याचा

त्यांनी प्रयत्न केला. परंतु त्यांना यश मिळाले नाही. तरीही त्यांनी चिकाटी न सोडता आपले प्रयत्न चालू ठेवले. यासाठी १९०३ मध्ये मुंबई येथील मराठा समाजाच्या मंडळींनी मराठा शिक्षण परिषद घेण्यासाठी पहिली बैठक बोलावली.

## अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद

पुढे २१ ऑक्टोबर १९०६ मध्ये मुंबई येथे रावबहादुर घमाजी मनाजी रुकारे यांच्या घरी यासंदर्भात पुन्हा बैठक झाली. या बैठकीला रावबहादुर विठ्ठल रामचंद्रराव वंडेकर, वासुदेव लिंगोजी बिर्जे, नारायण पोवार, दाजीराव दळवी तसेच बडोद्याहून खासेराव जाधव, गुणाजी निंबाळकर, भगवंतराव पाळेकर, कोल्हापूरचे भास्करराव जाधव उपस्थित होते. यावेळी धारवाड मराठी शिक्षण फंडाचे गणपतराव रामचंद्र माने यांनी धारवाड येथे मराठा शिक्षण परिषद घेण्याची तयारी दर्शवली. त्यामुळे पहिली अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद १९०७ मध्ये धारवाड येथे घेण्याचे निश्चित झाले. या पहिल्या परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडीबाबत वि.द. घाटे म्हणतात, "या पहिल्या अ.भा.म. शिक्षण परिषदेचे अध्यक्षस्थान श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी स्वीकारावे, अशी सर्वांची इच्छा होती. महाराज गेले वर्षभर प्रकृती स्वास्थ्यासाठी परदेशात असल्यामुळे त्यांची संमती घेणे आवश्यक होते. महाराजांना हिंदुस्थानात परतण्यास विलंब होत असल्याने ३० डिसेंबर, १९०७ ला धारवाडच्या अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे अध्यक्ष म्हणून सर्वानुमते खासेराव जाधव

यांची निवड करण्यात आली. खासेराव जाधव, अरविंद घोष, बॅ. केशवराव देशपांडे यांच्यासारख्या जहाल मित्रांचे पाठीराखे असले तरी, त्यांनी राष्ट्रीय कार्य आणि मराठ्यांच्या शिक्षणाचे कार्य परस्परविरोधी कधीच मानले नाही. त्यांच्या प्रयत्नामुळे आणि वजनामुळेच मराठा शिक्षण परिषदेला महाराज आणि बाहेरील नवनवे राजपुरुष, समाजातील कर्ते मंडळींचा पाठिंबा मिळत गेला."

पहिल्या परिषदेचे अध्यक्षपद सयाजीरावांना देण्याचा परिषदेचा निर्णय म्हणजे परिषदेचा मुख्य आधार सयाजीराव होते याला मिळालेला दुजोरा होय. त्याला कारणही तसेच होते. सयाजीरावांनी समाजातील प्रत्येक दुबळ्या घटकाला बळ दिले होते. हे बळ देत असताना आपला देश बलशाली व्हावा हीच त्यांची धारणा होती. त्यामुळेच १८८२ मध्ये त्यांनी आपल्या संस्थानातील सर्वात दुबळी प्रजा असणाऱ्या आदिवासी आणि अस्पृश्यांसाठी शिक्षण आणि वसतिगृहाची मोफत सुविधा निर्माण करून समाज तळातून पुन्हा बांधायला सुरुवात केली होती. मराठ्यांच्या शिक्षणाला त्यांनी दिलेले भक्कम पाठबळ हा याच प्रक्रियेचा भाग होता. मराठा शिक्षण परिषदेला सयाजीरावांनी दिलेले आर्थिक पाठबळ यादृष्टीने महत्त्वाचे होते. यासंदर्भात डॉ. शोभा इंगवले म्हणतात, "श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांनी प्रोत्साहन व प्रेरणा दिल्यामुळे अखिल भारतीय मराठा परिषद स्थापनेस अनुकूल वातावरण निर्माण झाले."

सयाजीरावांची प्रेरणा आणि पाठबळ असल्यामुळे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या पहिल्या दोन अधिवेशनाचे (१९०७ व १९०८) अध्यक्ष खासेराव जाधव होते. वि.द. घाटेंच्या म्हणण्यानुसार खासेराव हेच मराठा शिक्षण परिषदेच्या बैठकीचे ठिकाण, दैनंदिन व्यवस्थापन तसेच इतर मुख्य निर्णय घेत असत. १९०९ च्या तिसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष महाराजांचे लहान बंधू संपतराव गायकवाड होते. १९१० चे चौथे अधिवेशन बडोद्यात भरले होते. पहिल्या अधिवेशनाप्रमाणे पुन्हा एकदा या अधिवेशनाचे अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती सयाजीरावांना करण्यात आली. परंतु बडोद्यातच हे अधिवेशन होत असल्यामुळे माझ्याच गावात मी अध्यक्ष होणार नाही अशी भूमिका सयाजीरावांनी घेतली. त्यामुळे मालेगावचे शंभूसिंह राजे जाधवराव यांना या अधिवेशनाचे अध्यक्ष करण्यात आले.

या अधिवेशनात जनरल फंड निर्माण करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. त्यावेळी महाराजांनी या फंडासाठी १ लाख २५ हजार रुपये दिले. बडोद्याचे माजी दिवाण रामचंद्र धामणस्कर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या पत्नीने ७५ हजार रुपयांचा निधी दिला. या सगळ्याचा एकत्रित विचार करता फक्त बडोद्यातून १९१० मध्ये मराठ्यांच्या शिक्षणासाठी ३ लाख २५ हजार इतका निधी उभा राहिला. हा आकडाच मराठ्यांच्या उत्कर्षातील सयाजीरावांचे योगदान सांगून जातो. एकंदरीत मराठा शिक्षण परिषदेच्या कामासाठी खासेरावांनी घेतलेली मेहनत सर्वाधिक

होती आणि सयाजीरावांचा त्याला मुक्त पाठिंबा होता. सयाजीरावांनी बडोद्यामध्ये मराठा विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी स्वतंत्र निधी उभा केला. विशेष म्हणजे या निधीतून मुलांबरोबर मुलींनाही शिष्यवृत्ती देण्याचे धोरण होते. पुढे १९१४ च्या पुणे येथील अधिवेशनात अस्पृश्य मुलांना मराठ्यांच्या शिक्षण संस्थेत प्रवेश देण्याचा ठराव पास झाला. त्यामुळे जरी या परिषदेच्या नावात 'मराठा' हा शब्द आला असला तरी तो व्यापक अर्थाने आला होता असे म्हणावे लागेल. परिषदेचा हा ठराव सयाजीराव आणि खासेराव यांच्या धोरणाशी सुसंगत होता हे विशेष.

मराठा शिक्षण परिषदेच्या माध्यमातून खासेरावांनी ब्राम्हणेतर मुलांसाठी शिक्षण प्रसाराचे काम केले. ज्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक खर्च करण्याची ऐपत नव्हती, अशा शेकडो विद्यार्थ्यांना बडोद्यातून शिष्यवृत्ती देण्यात त्यांचा मोठा वाटा होता. त्याचबरोबर ज्या मराठा समाजातील कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली असूनही ते मुलांना परदेशात उच्चशिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन देत नसत, अशा कुटुंबातील मुलांना शिक्षणासाठी परदेशात पाठविण्याचा प्रयत्न खासेराव करायचे. खासेरावांनी ग्वाल्हेरचे बॅ. विनायकराव पवार आणि अमरावतीचे बॅ.रामराव देशमुख या दोघांना आग्रहाने परदेशी शिक्षणासाठी पाठवले. अमरावतीच्या ज्ञानोबा मोहिते यांना बडोद्याची शिष्यवृत्ती मिळवून दिली. ही शिष्यवृत्ती देताना शिक्षण पूर्ण झाल्यावर अमरावतीच्या शिवाजी मराठा सोसायटीच्या शिक्षण प्रसाराचे काम करण्याची

अट घातली होती. देवासचे खासेराव पवार यांना परदेशात शिक्षणासाठी आणि प्रवास खर्चासाठी खासेरावांनी बडोद्यातून मदत मिळवून दिली.

"मराठा शिक्षण परिषदेच्या स्थापनेपासून तो तहत तिला मूर्तस्वरूप येईपर्यंत तिच्या सर्वांगीण उन्नतीप्रीत्यर्थ तन-मन-धन- खर्च करणारे समाजभूषण श्रीमंत रा.ब. खासेराव जाधव यांच्या पुण्यस्मृतीस परिषदेच्या इतिहासाचा 'पूर्वार्ध' अत्यंत नम्रतेने अर्पण करीत आहे." मराठा शिक्षण परिषदेच्या स्थापनेत खासेरावांचे काय योगदान आहे याची साक्ष जयवंत जगताप यांनी संपादित केलेल्या परिषदेच्या या अहवालाच्या अर्पणपत्रिकेतून मिळते. खासेरावांनी महाराष्ट्रातील अनेक महत्त्वाच्या उपक्रमांमध्ये अपार कष्ट उपसले. खासेरावांच्या या कर्तबगारीला महाराजांच्या निर्विवाद पाठबळाचे अधिष्ठान होते.

बडोद्यात त्या काळात एकही मराठी वर्तमानपत्र प्रकाशित होत नव्हते. खासेरावांचे मित्र आणि मराठा शिक्षण परिषदेचे सक्रिय कार्यकर्ते भगवंतराव पाळेकर यांनी खासेरावांजवळ बडोद्यातील मराठी वाचकांसाठी वर्तमानपत्र सुरू करण्याची इच्छा व्यक्त केली. खासेरावांनी पाळेकरांच्या 'जागृती' या मराठी वृत्तपत्राला केवळ प्रोत्साहन दिले नाही तर सर्व प्रकारची आर्थिक मदतही केली.

## आर्य समाजाला पाठबळ

मानवकल्याणासाठी अविरत कार्य करणाऱ्या सत्यशोधक समाज, प्रार्थना समाज आणि आर्य समाजाला महाराजांचा राजाश्रय होता. आर्य समाजाच्या स्वामी नित्यानंद, स्वामी विश्वेश्वरानंद यांच्या भेटीतून खासेराव या महत्त्वाच्या संघटनेकडे ओढले गेले. सयाजीरावांचा राजाश्रय लाभल्याने संपतराव गायकवाड आणि खासेराव जाधव हे बडोद्यातील आर्य समाजाचे आधारस्तंभ बनले. महाराजांनी १८८२ मध्ये बडोद्यात अस्पृश्य मुलांसाठी शाळा सुरू केली. पण त्या शाळेतील विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी बहुजन व उच्चवर्णीय शिक्षक मिळेना. या कामासाठी त्यांना मुस्लिम समाजातील शिक्षक नेमावे लागले. पुढे महाराजांनी आर्य समाजाचे स्वामी नित्यानंद यांना शिक्षण विभागात कार्य करण्यासाठी एक कार्यकर्ता पाठविण्याची विनंती केली. त्यानुसार १९०८ मध्ये स्वामी नित्यानंद यांनी पंडित आत्माराम या विद्वान पंडितास पंजाबमधून बडोद्यात पाठविले. महाराजांनी त्यांची अस्पृश्य शाळांचे इन्स्पेक्टर म्हणून नेमणूक केली.

खासेराव बडोद्यातील आर्य समाजाचे कार्य पाहू लागल्यापासून महिन्याला दहा रुपये सेवा म्हणून जमा करू लागले. या पैशातून आर्य समाजाच्या कार्यालयासाठी शिवाजी रोडवर दांडिया बाजारात जागा भाड्याने घेतली. खासेराव आणि पं. आत्माराम यांनी अस्पृश्य आदिवासींच्या शिक्षणाच्या, वसतिगृहाच्या

व त्यांना नोकरी देण्यासंबंधीच्या अनेक योजना तयार केल्या आणि सयाजीरावांनी या योजनांना तत्काळ मान्यता दिली. खासेराव जाधव आर्य समाजाचे प्रधान असताना त्यांनी पोस्ट ऑफिसजवळ आर्य समाज सूर्यनारायण मंदिरास जागा मिळवून दिली. बडोद्यात राजपुत्र फत्तेसिंह आर्य अनाथाश्रम उभारण्यातही खासेरावांचा सहभाग होता.

## शाहू महाराजांचे मित्र आणि गुरू

राजर्षी शाहू आणि खासेराव यांच्यातील नाते अत्यंत जिव्हाळ्याचे होते. कित्येक प्रसंगी शाहू महाराज खासेरावांना खाजगी पत्रे लिहून महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करत असत. १९१६-१७ मध्ये सयाजीरावांची नात इंदुमती आणि शाहू महाराजांचे पुत्र राजाराम यांच्या विवाहाची बोलणी सुरू झाली. परंतु ती फारच ताणली गेली होती. त्यावेळी हा विवाह ठरणारच नाही अशी परिस्थिती निर्माण झाली होती. यामुळे खासेराव खूपच अस्वस्थ झाले होते. शाहू आणि सयाजीराव या दोघांचीही मने वळवण्यासाठी त्यांनी खूप धावपळ केली. यामागे या दोन राजांमधील जुन्या नातेसंबंधांना या लग्नाने नवा उजाळा मिळावा ही खासेरावांची तळमळ होती. खासेरावांचे सयाजीराव आणि शाहू या दोघांच्यावर अतूट प्रेम होते. राजर्षी शाहू खासेरावांना गुरुस्थानी मानत होते. त्यामुळे खासेराव हा या दोघांना जोडणारा दुवा होता. हा दुवा महाराष्ट्राच्या उत्कर्षाला लाभदायक ठरला असे इतिहास सांगतो.

## केळूसकरांचे इंग्रजी शिवचरित्र आणि खासेराव

कृष्णराव अर्जुन केळूसकरांच्या पहिल्या मराठी शिवचरित्राचा इंग्रजी अनुवाद प्रकाशित करण्यामध्ये खासेरावांचे योगदान फार मोठे आहे. खासेरावांचे तत्कालीन अनेक संस्थानिकांशी मैत्रीपूर्ण संबंध होते. त्यांचा शब्द सहसा कोण डावलत नसे. त्यामुळेच खासेरावांनी विविध संस्थानिकांकडून मोठा निधी या कामासाठी उभा करून दिला. त्यामुळे मराठी आणि बहुजन इतिहासकाराने लिहिलेले अत्यंत वस्तुनिष्ठ चरित्र जगभरातील अभ्यासकांना १९२१ मध्ये उपलब्ध झाले. दुर्दैवाने केळूसकरच महाराष्ट्राला फारसे माहीत नसल्यामुळे शिवछत्रपतींचे इंग्रजी चरित्र प्रकाशित होण्यामध्ये योगदान देणाऱ्या खासेरावांची माहिती महाराष्ट्राला कशी होणार? खासेरावांचे महाराष्ट्रातील आणखी एक काम म्हणजे पुण्यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या कामातील सहभाग होय. या स्मारकासंदर्भात मराठा विरुद्ध इतर असा संघर्ष पेटला होता त्यावेळी हा संघर्ष मिटवण्यासाठी ते दोन महिने पुण्यात येऊन राहिले होते. थोडक्यात सर्व मराठी संस्थानिकांमधील आणि प्रमुख मराठा पुढाऱ्यांमधील संवाद निर्माण करण्यासाठी ते आयुष्यभर झटत राहिले.

## खासेराव आणि विठ्ठल रामजी शिंदे

१९२० मध्ये मुंबई इलाख्याच्या कायदे मंडळाच्या निवडणुकीसाठी विठ्ठल रामजी शिंदे उभे होते. त्यांना निवडून आणण्यासाठी त्यांनी भरपूर कष्ट घेतले. विठ्ठल रामजी शिंदे यांना

बहुजन पक्षाचा उमेदवार म्हणून जाहीरनामा तयार करण्यासाठी त्यांना मदत केली. दोन महिने पुण्यात येऊन राहिले. इतकेच नाही तर वि.रा. शिंदेंच्या निवडणूक खर्चाची सर्व जबाबदारी त्यांनी उचलली. बडोद्यातून येतानाच ते खर्चाची रक्कम घेऊन आले होते. पुण्यातील मराठा जातीच्या दोन्ही गटांनी एकत्र येऊन शिंदेना पाठिंबा द्यावा यासाठी त्यांनी शेवटपर्यंत प्रयत्न केले परंतु त्यांना यश आले नाही. यासंदर्भात गो.मा.पवार म्हणतात,"मात्र शिंदे यांचे मित्र खासेराव जाधव यांनी या निवडणुकीनिमित्त दोन महिने आपला मुक्काम पुण्यामध्ये ठेवला. शिंदे यांना मते मिळावी यासाठी हिंडण्याचे परिश्रम घेतले व हजारो रुपयांचा खर्च केला. खासेराव जाधवांनी दाखवलेले प्रेम व केलेले कष्ट याबद्दल विठ्ठल रामजी शिंदे यांना त्यांच्याबद्दल अतिशय कृतज्ञता वाटली."

## पुण्याचे शिवस्मारक आणि खासेराव

शिक्षणासाठी अग्रेसर असलेल्या पुण्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक व्हावे असे श्री. शिवाजी मराठा सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना वाटू लागले. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अधिवेशनाच्या निमित्ताने महाराष्ट्र, बडोदा, ग्वाल्हेर, भोपाळ, नागपूर येथील मराठा संस्थानिक आणि मराठा समाजाचे अधिकारी एकत्र आले होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी पुण्यात एक बैठक झाली. ग्वाल्हेरचे श्री. माधवराव शिंदे या बैठकीस उपस्थित होते. माधवराव शिंदे

यांनी या कामासाठी पुढाकार घेण्याच्या चिटणीसांनी केलेल्या आग्रहानुसार शिंदे सरकारांनी ते काम स्वीकारले. काही दिवसात प्रिन्स ऑफ वेल्स हिंदुस्थानच्या भेटीला येणार होते. त्यामुळे राजपुत्रांच्या हस्ते स्मारकाचा कोनशिला समारंभ करण्याचे ठरविले. स्मारकासंदर्भात सभासदांचे एक शिष्टमंडळ मुंबईत गव्हर्नरांना भेटले. गव्हर्नरांना शिवाजी स्मारकाची कल्पना पसंत पडली; पण त्यांनी छत्रपतींचे हे स्मारक अखिल भारतीय असावे अशी अट घातली. केवळ मराठा जातींचे ते स्मारक असेल तर राजपुत्र येणार नाहीत, त्यामुळे गव्हर्नरांची ही अट शिष्टमंडळास मान्य करावी लागली.

राजर्षी शाहू आणि माधवराव शिंदे यांच्या पुढाकाराने पुण्यात छत्रपती शिवाजी स्मारकाचा कोनशिला कार्यक्रम पार पडला. काही दिवसांनी माधवराव शिंदे यांनी मुंबईत आपल्या बंगल्यावर सर्व समाजातील निवडक मंडळींची बैठक बोलावली. या बैठकीत शिवरायांच्या सर्वपक्षीय स्मारकाची योजना मांडली. त्याचबरोबर या स्मारकासाठी वर्गणी गोळा करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. त्यात मराठे, ब्राम्हण, पारशी, गुजराथी सर्व जातींची प्रमुख मंडळी घेण्यात आली. या बैठकीत सर्वपक्षीय स्मारकाच्या योजनेला कोणीही उघड विरोध केला नाही; पण बैठक संपताच जमलेल्या काही मंडळीत या विरोधात चर्चा सुरू झाली. पुण्यातील मराठ्यांनी छत्रपती शिवाजी स्मारकाच्या इमारतीचे काम सुरू करण्यास विरोध केला. एवढेच नव्हे तर इतर

जातींच्या मंडळींना स्मारक निधी समितीत घेतल्याबद्दल शिंदे सरकारचा जाहीर निषेधही केला.

शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या उद्‌घाटन कार्यक्रमाच्या तयारीसाठी खासेराव जाधव दोन महिने बडोद्याहून पुण्यात येऊन राहिले. स्मारकाविरुद्ध चुकीचे आरोप थांबवावे म्हणून त्यांनी प्रयत्न केले. खासेराव विरोध करणाऱ्या मराठा पुढाऱ्यांपुढे हात जोडून विनंती करू लागले. "तुम्ही जो विरोध करत आहात हा श्री. शिंदे सरकारांना नसून छत्रपती शिवरायांचा आणि सबंध मराठा समाजाचा हा अपमान आहे याची तुम्हाला कल्पना येत नाही. मराठ्यांनी जातीचा अभिमान बाळगावा; पण इतर जातींचा अनाठाई द्वेष करणे, हे शिवरायांच्या धोरणाविरुद्ध तुम्ही करत आहात. हा नाद सोडून द्या." परंतु मराठा पुढाऱ्यांनी खासेरावांची ही विनंती मान्य केली नाही. शेवटी महाराजा शिंदेंनी स्मारकाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. मराठ्यांच्या आडमुठेपणाविषयी खासेरावांना वाईट वाटले आणि दुःखही झाले.

महाराजा सयाजीराव आणि महाराष्ट्र हे नाते तपासत असताना एक बाब स्पष्ट होते ती अशी की, या नात्याला शेकडो पदर होते. त्यामुळे सयाजीरावांशी नाते सांगणारा प्रत्येक पदर डोळसपणे तपासल्याशिवाय जसा सयाजीरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिपूर्ण वेध घेता येणार नाही, त्याचप्रमाणे सयाजीरावांच्या कार्याचा 'कॅन्व्हास'ही समजून घेता येत नाही. आपल्या प्रागतिक चळवळी आपण टोकाच्या व्यक्तिकेंद्री भूमिकेतून अभ्यासल्यामुळे या

चळवळींमधील अंतर्विरोध आणि संवाद या दोन्ही बाबी आपल्या दृष्टीकक्षेत आल्या नाहीत. म्हणूनच सयाजीरावांच्या निमित्ताने आपला इतिहास जोडून समजून घेण्याची संस्कृती विकसित झाली तर ती आपल्या भविष्यातील वाटचालीला उपयुक्त ठरेल. सयाजीरावांप्रमाणे खासेरावांची जन्मभूमी महाराष्ट्र होती तर कर्मभूमी बडोदा होती. दोघांनीही आपल्या जन्मभूमीशी आपले नाते आयुष्यभर जपले आणि या जन्मभूमीच्या उत्कर्षाला प्रत्येक टप्प्यावर हातभार लावला. त्यामुळेच आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या भूमिपुत्रांच्या यादीत महाराष्ट्राला खासेरावांना सन्मानाचे स्थान द्यावे लागेल.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर
- दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
- डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूस्कर
- सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
- दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव
गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
- शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पूरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
- देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्मपरिषद
- डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
- राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
- निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
- सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक
कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण
परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
- राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि
जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम
राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाची महाराजा सयाजीरावांची वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com